NAAC Accredited 2015
'B' Grade (CGPA -2.62)

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर
# सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## विद्यार्थी विकास विभाग
### अँन्टी रॅगींग समिती बैठकवृत्तांत

महाविद्यालये शिक्षणसंस्था तसेच प्रस्तूत विद्यापीठाच्या संकुलात रॅगींगच्या घटना घडू नयेत तसेच एखादी घटना विद्यापीठ परिसरात घडल्यास याबाबत उपाय योजना तसेच नियंत्रण ठेवण्यासाठी अँन्टी रॅगींग समिती स्थापन करण्यात आली असून सदर समितीची बैठक मा कुलगुरू महोदया यांच्या अध्यक्षतेखाली दि.११/१०/२०१९ रोजी सकाळी ११.३० वाजता विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या सभागृहात पार पडली सदर बैठकीस खालील मान्यवर उपस्थित होते.

| मान्यवरांचे नाव | पद |
|---|---|
| मा. कुलगुरु | अध्यक्ष |
| मा. प्र कुलगुरु | सदस्य |
| मा संचालक विद्यार्थी विकास | सदस्य |
| सौ. ज्योती माशाळे<br>शिक्षक प्रतिनिधी | सदस्य |
| मा पोलीस निरीक्षक<br>फोजदार चावडी पोलीस ठाणे सोलापूर यांचे प्रतिनिधी<br>पोलीस निरीक्षक प्रविण पाटील | सदस्य |
| अजित बिराजदार<br>दै. दिव्यमराठी सोलापूर | सदस्य |
| श्रीमती उल्पा सुरवसे, सोलापूर<br>पालक प्रतिनिधी | सदस्य |
| कु पुजा खपाले,<br>विद्यार्थी प्रतिनिधी | सदस्य |
| अधिक्षिका मुलींचे वसतीगृह | सदस्य |
| मा कुलसचिव | सदस्य सचिव |

प्रस्तावीक स्वागत व मार्गदर्शक :- प्रथमता मा संचालक यांनी रॅगींग विरोधी समितीची स्थापना करण्यामागची पर्श्वभुमी सांगून उपस्थित आसलेल्या नविन सदस्याचा परीचय करून दिला. उपस्थित सदस्याना मार्गदर्शन करताना मा कुलगुरू महोदया यांनी खालील प्रमाणे मुद्यावर चर्चा करून त्यावर त्वरीत आंमलबजावणी करण्याबाबत निर्देश दिले.

१ सर्व संलग्न महाविद्यालयांना अँन्टी रॅगींग समिती स्थापना करण्यास ,केली आसल्यास बैठक आयोजन करण्यास, बैठक आयोजित केल्यास त्याबाबतचा अहवाल या विभागास पाठविण्याबाबत स्मरण पत्र पाठविण्याचे ठरले .

(विद्यार्थी विकास विभाग)

२ मा कुलगुरू महोदया यांनी महाविद्यालयाला भेटी देण्यासाठी अँन्टी रॅगींग स्क्वॅड स्थापन करण्यात यावे व आठवडयातून दोन दिवस महाविद्यालयांना भेटी द्याव्यात असे ठरले

३ महाविद्यालयांना तक्रार पेटी तयार करण्याबाबत व सदर तक्रार पेटी आठवडयातून दोन दिवस मा प्राचार्य यांच्या समक्ष व अँन्टी रॅगींग समितीपुढे उघडण्यात यावी तसेच अँन्टी रॅगींग समितीची स्थापना ,समितीची नावे ठळक पध्दतीने दिसतील अशा ठीकाणी बोर्ड तयार करून लावण्यात बाबत कळविण्यात यावे असे सर्वानूमते ठरले.

४ महाविद्यालयातील एन सी सी मधील मुलींच्या माध्यमातून अँन्टी रॅगींगबाबत मैत्रीपुर्ण जागरूकता करण्याबाबत तसेच रॅगींग केल्याने होणारे नुकसान तसेच त्याबाबत होणारी कायदेशीर कारवाही याबाबत माहीती देण्यासाठी व्याख्यान व पथनाट्य आयोजित करण्याबाबत महाविद्यालयांना कळविण्यात यावे तसेच व्याख्यानाच्या कार्यक्रमाचे आयोजन सत्र परिक्षा संपल्यानंतर करण्याबाबत महाविद्यालयांना कळविण्यात यावे असे ठरले.

५ मा पोलीस निरीक्षक फौजदार चावडी पोलीस ठाणे यांचे प्रतिनिधी पोलीस निरीक्षक प्रविण पाटील यांनी सुचविल्या प्रमाणे पोलीस विभागाकडून दामीनी पथकाचे स्थापना केली आहे. सदर दामीनी पथकाचे मोबाईल क्रमांक महाविद्यालयांना देण्यात येतील मुलींना रॅगींगचा त्रास झाल्यास सदर क्रमांकावर संपर्क साधून मदत मागता येईल असे त्यांनी सुचविले त्याप्रमाणे दामीनी पथकाचा मोबाईल क्रमांक डीस्प्ले करून महाविद्यालयात सहज दिसेल असे लावण्याबाबत महाविद्यालयांना कळविण्यात यावे असे सर्वानूमते ठरविण्यात आले.

मा संचालक विद्यार्थी विकास यांनी सर्व सदस्याचे आभार मानले व मा अध्यक्ष महोदय यांच्या परवानगीने बैठक संपल्याचे जाहीर केले

11/10/2019
मा संचालक
विद्यार्थी विकास

11.10.19
मा कुलसचिव

11.10.19
मा कुलगुरू

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ
(विद्यार्थी विकास विभाग)